**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
**उमेद-जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,**
**तिसरा माळा, खोली क्रमांक ३०७, जिल्हा परिषद,**
**- यवतमाळ -**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान उर्फ उमेद अभियाना अंतर्गत प्रभागसंघ व्यवस्थापक (Cluster Level Federation Manager) या पदाकरिता **पं.स.झरी जामनी** येथील जि.प.प्रभाग माथार्जुन,पाटण **पं.स.यवतमाळ** येथील आसोला-तळेगाव,हिवरी-अकोला बाजार,रुई-तिवसा-,येलाबारा चिचघाट, **पं.स.आर्णी** येथील बोरगाव –भंडारी ,जवळा-लोणी,देऊरवादी-सुकळी,इचोरा सावळी **,पं.स.दारव्हा** लाडखेड,महागाव क.,बोरीअ. डोलरी दे.,लोही **पं.स.महागाव** येथील फुलसावंगी,हिवरा,गुज,सवना ,काळी दौ.**पं.स.उमरखेड** येथील मुळावा,पोफळी,निंगनूर,विडूळ,ढानकी,दराटी, **पं.स.वणी** येथील चिखलगाव –राजूर ,लालगुढा-लाठी,घोन्सा-कायर ,शिरपूर-शिंदोला,-**पं.स.मारेगाव** येथील बोटोनी –वेगाव,कुंभा –मार्डी **पं.स.दिग्रस** येथील कालगाव –डेहनी,मोख आरंभी,सिंगद-मांडवा,**पं.स.नेर** येथील वटफळी,मंगलादेवी,मालखेड बु. **प.स.पुसद** येथील बेलोरा बु.,गायमख नगर , काकडदाती,मोहा इ.,श्रीरामपूर,सेलू बु. **पं.स.केळापूर** पहापळ,खैरगाव **पं.स.राळेगाव** येथील राळेगाव या प्रभागासाठी साठी अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रती प्रभागसंघ एक पद भरण्यात येईल. पदासाठी पात्रता निकष खालील प्रमाणे आहेत.

१.सदर पद महिलांसाठी राखीव आहे.
२. सदरील महिला "उमेद" स्वयंसहाय्यता समूहाची सदस्य असावी.
३. अर्जदार महिला ज्या प्रभागातून अर्ज करणार आहे त्या प्रभागातील रहिवासी असावी व त्यासाठी ग्रामपंचायतीचा रहिवासी दाखला सादर करणे बंधनकारक राहील.
४. ती ज्या गट व ग्रामसंघाची सदस्य आहे.तिचा समुह / ग्रामसंघ A किंवा B श्रेणीतील असावा व दशसुत्रीचे पालन करणारा असावा.
५. तिचा समुह, ग्रामसंघ हा प्रभागसंघाचा सदस्य असावा व तिची गटात ८०% उपस्थिती असावी.
६. तिचे वय किमान २१ वर्ष व कमाल ४५ वर्ष पेक्ष्या जास्त नसावे.(अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेला ४५ वर्षपेक्षा जास्त नसावे )
७. शिक्षण हे कुठल्याही शाखेची किमान HSC पूर्ण केलेले असावे. त्यासाठी १२ वी पास असल्याचे Certificate सादर करणे बंधनकारक असेल.
८. उमेद अभियाना अंतर्गत समुह, ग्रामसंघ व प्रभागसंघ यांच्या सोबत हिशोबनीस, ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल, समुदाय संसाधन व्यक्ती (सर्व) ई पदावर काम करण्याचा किमान ३ वर्षाचा कामाचा अनुभव असणे बंधनकारक आहे. अनुभव प्रमाणपत्र तालुका अभियान व्यवस्थापक याचे सादर करणे आवश्यक आहे.दि. 24/08/2021 ला तीन वर्ष अनुभव पूर्ण असणे आवशयक आहे.
९. तिचा समूहाचे व स्वतः अभियानायांतर्गत SM १, SM २ व VM १ हे प्रशिक्षण झालेले अथवा घेतलेले असावे.
१०. स्वताचे गाव सोडून नेमून दिलेल्या प्रभागातील गावांमध्ये प्रवास करुण क्षेत्रकार्य काम करण्याची तयारी असावी.
११. ती वंचित कुटुंबातील सदस्य, विधवा, परितक्त्या, अ.जा., अ.ज., दिव्यांग आदिम जाती/जमाती ई. प्रवर्गातील महिलांना प्राधान्य देण्यात येईल.
१२. संगणकाचे ज्ञान असल्यास प्राधान्य देण्यात येईल. त्यासाठी शासन मान्यताप्राप्त संस्थेचे किमान ९० दिवसाचे तत्सम संगणकाचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचा दाखला (Certificate) सादर करणे बंधनकारक असेल.
१३. उत्तम सुसंवादी नेतृत्व गुण असलेली व गरीब कुटुंबाच्या प्रश्नांवर संवेदनशिलतेने काम करणारी असावी.

तरी सदर निकषांच्या आधारावर महिलांनी वर नमूद पदासाठी अर्ज करावा.

अर्जाचा नमुना संबंधित तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष येथे उपलब्ध आहेत व दिनांक 2/09/2021 अर्ज भरण्याची शेवटची दिनांक आहे. अर्ज सादर करण्याच्या मुदतीत संबंधित तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष येथे कार्यालयीन वेळेत सायं.५.४५ वा.पर्यंत सादर करावा. अर्ज विहित वेळेत प्राप्त न झाल्यास उशिरा प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**जिल्हा अभियान व्यवस्थापक**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष**
**यवतमाळ**